जिल्हा परिषद, रायगड

# ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
## (निविदा सुचना नं. २५ सन २०२६-२७)

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडील खालील कामांची निविदा योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यांत येत आहेत. तरी खालील निविदाबाबतची सर्व माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी (जीएसटी सह) | वर्गवारी | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|
| | **पहिले बोलावणे** | | | | | |
| १ | छत्रपती शिवाजी महाराज यांचे ३५३ वा राज्यभिषेक सोहळयाकरीता दि.०६/०६/२०२६ व दि. २६/०६/२०२६ दरम्यान रायगड किल्यावर कचऱ्याचे संकलन करणे ता.महाड जि.रायगड | १२०१२४०/- | १२०१२/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार खुला |

- **वरील कामाची संपुर्ण माहिती शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १८/०५/२०२६ रोजी १०.०० वाजलेपासून ते दि.२२/०५/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यत उपलब्ध आहे, यादरम्यान निविदा भरता व डाऊनलोड करता येतील.**

- **निविदेचे वेळापत्रक -**

| तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| संकेतस्थळावरुन ई- निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | दि. १८/०५/२०२६ पासून | १०.०० |
| | दि. २२/०५/२०२६ पर्यत | १७.०० |
| ई- निविदा सादर करणेचा अंतिम कालावधी | दि. २२/०५/२०२६ पर्यत | १७.०० |
| ई- निविदा उघडणेची वेळ व तारिख | दि. २५/०५/२०२६ नंतर (कार्यालयीन सोयीनुसार) | १७.०० |
| ई- निविदा उघडणेसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप- अलिबाग | |
| | मा. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग राजिप | |
| | मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, राजिप,अलिबाग | |

- **कचरा व्यवस्थापन करिता इतर अटी व शर्ती**

| अ.क्र | कचरा व्यवस्थापन (गडावर ) | कचरा व्यवस्थापन - (गडाखाली ) |
|---|---|---|
| 1 | प्लास्टिक संकलनासाठी गडावर पुरेसे डस्टबीन ठेवणे तसेच भरलेल्या डस्टबीन बॅग रोपवेने गडाखाली नेऊन नियमित प्लास्टिक संकलन करून ते पुढील प्रकिया करणेकरिता एजन्सीला देणे व त्याची शास्त्रोक्त व्यवस्था करणे. किंवा पुनर्प्रक्रिया साठी पाठविणे. | प्लास्टिक संकलनासाठी गडाखालील ठिकाणी पुरेसे डस्टबीन ठेवणे तसेच भरलेल्या डस्टबीन नियमित प्लास्टिक संकलन करून ते पुढील प्रकिया करणेकरिता एजन्सीला देणे व त्याची शास्त्रोक्त व्यवस्था करणे. किंवा पुनर्प्रक्रिया साठी पाठविणे. |
| 2 | प्लास्टिक संकलन करण्यात येणाऱ्या गारबेज बॅग या कचरा वहन करणाऱ्या आकाराच्या (size) असाव्यात. | प्लास्टिक संकलन करण्यात येणाऱ्या गारबेज बॅग या कचरा वहन करणाऱ्या आकाराच्या (size) असाव्यात. |
| 3 | गडावरील विविध ठिकाणी डस्टबीन वाहतूक करता येईल अशा साईझ च्या असाव्यात व त्यामध्ये गारबेज बॅग ठेवणे. डस्टबीन भरल्यानंतर त्यातील कचरा त्वरित काढून केंद्र निश्चित करून त्या ठिकाणी केंद्रात साठविणे. व डस्टबीन त्वरित वापर योग्य स्थितीत ठेवणे. | गडाखालील विविध ठिकाणी डस्टबीन वाहतूक करता येईल अशा साईझ च्या असाव्यात व त्यामध्ये गारबेज बॅग ठेवणे. डस्टबीन भरल्यानंतर त्यातील कचरा त्वरित काढून केंद्र निश्चित करून त्या ठिकाणी केंद्रात साठविणे. व डस्टबीन त्वरित वापर योग्य स्थितीत ठेवणे. |

| | | |
|---|---|---|
| 4 | गडावरील व पायरी मार्गावरील साठविलेले प्लास्टिक पुनर्प्रक्रियासाठी योग्य एजन्सी कडे देणे. | गडाखालील साठविलेले प्लास्टिक पुनर्प्रक्रियासाठी योग्य एजन्सी कडे देणे. |
| 5 | कार्यक्रमानंतर गडावरील प्लास्टिक संकलन केंद्रातील सर्व कचरा उचलून गड परिसर पूर्ववत स्वच्छ ठेवणे. | कार्यक्रमानंतर गडाखालील प्लास्टिक संकलन केंद्रातील सर्व कचरा उचलून गडा खालील परिसर पूर्ववत स्वच्छ ठेवणे |

- निविदेच्या अटी व शती खालीलप्रमाणे-

1) वरील कामाची निविदा पी (Tender Fee) इसारा रक्कम ही शासनाचे वरील www. Mahatenders.gov.in या संकेतस्थळावर आपले लॉगीन दवारे भरणेची सुविधेनुसार भरणा करावी व त्याची PDF प्रत तांत्रिक लिफाफ्यात अपलोड करावी.
2) निविदा भरणेपूर्वी संबधित ठेकेदाराने निवीदेत जाहीर केलेल्या वेळेनुसार गडाखालील व गडावरील स्थळ पाहणी केलेचा अहवाल / प्रमाणपत्र संबधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे जोडणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र नसल्यास संबधित ठेकेदारास अपात्र करणेत येईल.
3) गडावर व गडाखाली आपले मार्फत काम करणा-या मजुरांचा विमा उतविणे बंधनकारक राहील व सदर विम्याची प्रत विभागीय कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल
4) निविदाधारकास ओला व सुका कचरा विलगीकरण करुन गडावरील रोपवेच्या स्थळपर्यत आणून वाहतुकीदवारे लाडीवली येथील डंपीग पर्यत पोहोचवणे बंधनकारक राहील. सदरील कचरा गडाच्या आसपास परिसरात कोठेही टाकण्यात येवू नये.
5) जि. प. रायगड यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार खुला नोदणी प्रमाणपत्राची मूळप्रत(Registration Copy) निविदेसोबत अपलोड करावी लागेल
6) खुल्या वर्गातील कंत्राटदारांकडे जिल्हा परिषद रायगड कडील नोंदणी प्रमाणपत्र नाही अशा कंत्राटदारांनी कंत्राटदार नोदणी प्रमाणपत्र प्राप्त करावे व निविदा सादर करावी.
7) निविदाधारकाने पॅनकार्ड व आधारकार्ड याची स्कॅनप्रत तांत्रिक लिफाफथात अपलोड करावी.
8) GST CERTIFICATE ORIGINAL COPY (स्कॅन) प्रत निविदेसोबत सादर करावी.
9) निविदाधारकाने सदर योजनेच्या अंमलबजावणीचे कामाचे ठिकाणी स्वतः जावून नैसर्गिक परिस्थीतीचा आढावा घेणे गरजेचे आहे. व तदनंतर सदरील काम करणेची स्वतः ची खात्री पटल्यानंतरच निविदा सादर करावी.
10) सदरील कामाचा आर्थिक लिफाफा उघडलेनंतर L1 निविदाधारकांने जिल्हा परिषद सांगिल अशा मुदतीत विहित नमुन्यात करारनामा करुन घेणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केलेस संबंधित L1 निविदाधारकावर कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.
11) निविदा प्रपत्रातील Declaration of the contractor विहीत नमुन्यातील कंत्राटदाराचे रु. 500/- च्या बॉड (Bond) पेपरवर स्कॅनप्रत अपलोड करावी.
12) वित्त विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. GST1017/प्र.क्र.81/कराधान 1 मंत्रालय, मुंबई दि. 19/08/2017 मधील मुददा क्र. 1 नुसार निविदा सादर करताना दि. 01/07/2017 नंतर लागू झालेल्या GST कराच्या बोज्याचा विचार करुनच कंत्राटदराने निविदा सादर करणे अनिवार्य आहे.
13) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. बीजीडी-2016/प्र.क्र./इमा-2 मत्रालय मुंबई यांचे दि. 12/02/2016 मधील मार्गदर्शक सुचनेनुसार प्राप्त निम्नतम निविदेच्या देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 1% ते 10% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या 1% एवढ्या रकमेच्या धनाकर्ष (Demand Draft) (मुख्य लेखा व वित्ताधिकारी, राजिप) यांचे नावे परफॉर्मन्स सिक्युरीटीम्हणून या कार्यालयात सादर करावा लागेल. (उदा 1% ते 10% कमी दर 1% रक्कम)
14) ठेकेदाराने कामावर आलेल्या मजुरांची यादी ई-निविदेसोबत जोडणेत यावी तसेच कामावर आलेल्या सर्व मजुराचा काम सुरु करण्यापुर्वी विमा काढण्यात यावा अन्यथा प्रत्यक्ष काम करतेवेळी मजुर कर्मचारी अनावधानाने अपघात व दुखापत, मृत्यु झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल त्यासाठी जिल्हा परिषद मार्फतकोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.
15) या कामासाठी आलेल्या निविदापैकी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रदद करणेचे अधिकार निविदा समितीने राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा सादर करणा-या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला (निविदा) रदद केल्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.

16) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीएटी 2018/प्र.क्र. 127/इमार मंत्रालय मुंबई दि 28/11/2018 नुसार निविदेसोबत सादर करणयात आलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास भारतीय दंड विधान संहितेच्या कलम अंतर्गत संबंधित कंत्राटदाराविरुध्द फौजदाती गुन्हा दाखल करणेत येईल याची सर्वस्वी जबाबदारी ऑनलाईन खोटी कागदपत्रे सादर करणारे कंत्राटदार यांची असेल याची नोंद घ्यावी.

17) ऑनलाईन निविदा सादर केल्यानंतर, निविदाधारकास लेखी पत्र देऊन निविदेतून माघार घेता येणार नाही. निविदाधारकाने असे केल्याचे दिसून आलेस संबंधित निविदाधारकाचे नोंदणी प्रमाणपत्र काळया यादीत समाविष्ट करणे तसेच त्याची सुरक्षा अनामत इसारा रक्कम जप्त करणेची कार्यवाही करणेत येईल याची निविदाधारकाने गंभीर नोंद घ्यावी.

18) वर नमुद निविदा कोणत्याही क्षणी रदद करणेचे तसेच मंजुर / नामंजुरीचे अधिकार निविदा समितीने राखून ठेवले असून ते निविदाधारकावर बंधनकारक राहतील व याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

**19) सदरील काम हे अतितात्काळ व विहीत मुदतीसाठी असल्याने अल्प कालावधीकरीता (5 दिवस) निविदा सुचना प्रसिध्द केली आहे**

20) वरील सर्व अटी व शर्ती निविदाधारकास मान्य असल्याने त्याने निविदा सादर केली आहे असे गृहीत धरले जाईल

सही/-
(मोहन ना.सरवदे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

सही/-
(शुभांगी नाखले)
प्रकल्प संचालक (जजीमि) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

सही/-
(राहुल कदम)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

सही/-
(नेहा भोसले) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

Signature Not Verified
Digitally signed by MOHAN NAGNATH SARWADE
Date: 2026.05.17 22:01:22 IST
Location: Maharashtra-MH